श्री शुभम बाळासाहेब जाधव, परिचर, पंचायत समिती पाथर्डी, हे कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर असलेने त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करणे बाबत..

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश जा.क्र. साप्रवि-१/आस्था-४/१२५/४५६/२०२६
अहिल्यानगर दिनांक — स्वाक्षरी खाली नमूद प्रमाणे

वाचा :- १. इकडील ज्ञापन/दोषारोपपत्र जा. क्र. साप्रवि-१/आस्था-४/१२५/१४६/२०२६, दिनांक २४/०३/२०२६
२. गट विकास अधिकारी, पं. स. पाथर्डी यांचेकडील पत्र जा. क्र. कार्या-१/आस्था-१/३३०/२०२६ दिनांक १०/०४/२०२६
३. इकडील अंतिम कारणे दाखवा नोटिस जा. क्र. साप्रवि-१/आस्था-४/१२५/३३४/२०२६, दिनांक ११/०६/२०२६
४. गटविकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी यांचेकडील पत्र क्र. वशि/आस्था-१/७६०/२०२६, दिनांक २१/०७/२०२६
५. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) मधील नियम १९६४ मध्ये ४ ( 2 )

श्री शुभम बाळासाहेब जाधव, परिचर हे पंचायत समिती पाथर्डी येथे कार्यरत असताना दि.२८.०४.२०२५ ते दि.१०.११.२०२५ या कालावधीत एकुण ४९ दिवस कार्यालयास कोणतीही पुर्वकल्पना न देता कार्यालयीन कामी अनाधिकृतपणे गैरहजर राहिलेने व वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाचा अवमान / अनादर केल्याने संदर्भ क्र. ०१ नुसार दोषारोप पत्र बजावण्यात येऊन खुलासा सादर करणेबाबत कळविणेत आले होते. संदर्भ क्र. ०२ नुसार श्री शुभम बाळासाहेब जाधव, परिचर यांनी खुलासा सादर करुन दोषारोप मान्य केलेने श्री जाधव हे महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( शिस्त व अपील) नियम १९६४ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरत असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( शिस्त व अपील ) नियम १९६४ मधील ४ (२) च्या तरतुदीनुसार दोन वेतनवाढी तात्पुरत्या स्वरुपात रोखणेची शिक्षा अंतिम का करु नये? या बाबत संदर्भ क्र. ०३ अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटिस बजावणेत येऊन खुलासा सादर करणे बाबत कळविणेत आले.

श्री शुभम बाळासाहेब जाधव, परिचर यांनी संदर्भ क्र. ०४ नुसार खुलासा सादर केलेला आहे. श्री शुभम जाधव यांनी त्यांचेवर ठेवणेत आलेले दोषारोप मान्य केलेने कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर राहिलेने तसेच वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाचा अवमान / अनादर केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे. यावरुन श्री शुभम बाळासाहेब जाधव हे शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरत असल्याचे नियुक्ती प्राधिकरणाचे मत झालेले आहे.

सबब, श्री शुभम जाधव यांचा खुलासा अमान्य करणेत येत आहे. श्री शुभम जाधव यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ ( 2 ) नुसार, दोन वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात रोखणे ही शिक्षा या आदेशाव्दारे अंतिम करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री शुभम बाळासाहेब जाधव, परिचर, पंचायत समिती पाथर्डी यांच्या मुळ सेवापुस्तकात घेणेत यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषद www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक 202608180401154 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 18-08-2026 22:34:19
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री शुभम बाळासाहेब जाधव, परिचर, पंचायत समिती पाथर्डी

व्दारा व प्रत - गटविकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी

२/- सदरचा आदेश श्री शुभम बाळासाहेब जाधव, परिचर, पंचायत समिती पाथर्डी यांना बजावून दुस-या प्रतीवर त्यांची स्वाक्षरी घेवून या कार्यालयास सादर करावी व सदर आदेशाची नोंद संबंधितांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

प्रत - निवड नस्ती